An International Peer Reviewed & Referred
INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# शिक्षक–शिक्षणातील बोकाळलेला भ्रष्टाचार आणि शिक्षकांची पिळवणूक

**सहा.प्रा.खिल्लारे सुधीर यशवंता**

*एम.ए.,(इंग्रजी,अर्थ) एम.एड्,सेट,नेट शिक्षणशास्त्र आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शेवगांव*

**प्रास्ताविक :–** कोणत्याही देशाचा विकास,व्यक्तिचा विकास,समाजाचा विकास हा शिक्षणाच्या स्वरूपावर अवलंबुन असतो. शिक्षणाची प्रगती,प्रतिष्ठा,शिक्षण देणाचा शिक्षकांवर अवलंबून आहे.याचाच अर्थ राष्ट्रविकासाचे,समाज विकासाचे कार्य शिक्षकांवरच आहे.म्हणुन असे म्हटले जाते की, शिक्षक हा राष्ट्र निर्माता आहे. शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण अध्यापन कार्य घडविण्यात शिक्षक शिक्षणाचा सिंहाचा वाटा असतो. म्हणून शिक्षक शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्याची शिफारस शिक्षण समित्यांनी केली आहे. पारंपारिक आदर्श पध्दती पेक्षाही तंत्रविज्ञानाचा पाया असलेले दर्जेदार ,गुणवत्तापूर्ण अध्यापन घडविण्याचे कार्य शिक्षक प्रशिक्षण संस्थावर आहे. यालाच आता **शिक्षक शिक्षण** असे संबोधले जात आहे.

“A Soumd programme of professional education of teachr is essential for the qualitive improvement of education ” Recommedations by Indian Education commission.

शिक्षकांच्या शिक्षणाशिवाय कोणताही शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी होउ शकत नाही संपूर्ण शिक्षण प्रणाली शिक्षकांभोवती फिरत असते म्हणून शिक्षक हा विदयार्थ्यांचा बोध्दिक पालक असे म्हटले जाते.

माध्यमिक शिक्षण अहवालानही असे नमुद केले आहे की शिक्षणाच्या पुनर्रचनेचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय. शिक्षकांचे वैयक्तिक गुणवैशिष्टये,शैक्षणिक पात्रता,व्यावसायिक पात्रता,त्याचे शाळेतील व समाजातील स्थान शैक्षणिक प्रक्रियेस गतिमान बनविले शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी दर्जेदार शिक्षक शिक्षण कार्यक्रम आवश्यक असते.

**व्याख्या :–** 1. शिक्षक शिक्षण म्हणजे औपचारिक व अनौपचारिक कृती व अनुभवांचा साठा जो व्यक्तीला अर्हता प्राप्त करण्यास व्यावसायिक जबाबदारी ओळखण्यास मदत करतो.

2. शिक्षणाचे तत्त्वज्ञान ,समाजलक्षी कार्य व आशयचुकता पध्दती मीमांसा या दृष्टिकोनातून अध्यापनासंबंधी दिले जाणारे शिक्षण म्हणजे शिक्षक शिक्षण होय.

**अर्थ :–**1 शिक्षणासंबंधी सेवाभावी वृत्ती निर्माण करणाचा शिक्षणास शिक्षक प्रशिक्षण असे म्हणतात.

2. शिक्षकी पेशास आवश्यक अध्यापन कौशल्ये विकसित करणारे प्रशिक्षण म्हणजे शिक्षण प्रशिक्षण होय.

3. शिक्षकांची समाजनिष्ठा,व्यवसायनिष्ठा,विदयार्थीनिष्ठा,या बाबतीत गुणसमुचय वाढीस लावण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षक प्रशिक्षण होय.

वरील प्रमाणे शिक्षक शिक्षणाच्या आदर्शातमक व्याख्या आणि अर्थ जरी शिक्षण तज्ञांनी सांगितला असला तरी आज मात्र शिक्षक शिक्षणाची सदयस्थिती वेगळी आहे. आणि भविष्यात मात्र ती महाभंयकर असणार आहे. असे म्हणतात की बदल हा निसर्गचा नियम आहे स्थितीशील असे काहीच नाही आज सर्वच क्षेत्रात झपाटयाने बदल होत आहे.जागतिकीकरणाच्या स्पर्धेच्या युगात जर आपणास टिकायचे असेल तर आपले सर्व उपक्रम आजच्याच दृष्टीने नव्हे तर भविष्यकाळातही कसे उपयुक्म ठरतील याचा विचार करावा लागेल वर्तमानाच्या खांदयावर बसून भविष्याचा वेध घ्यावा लागेल शैक्षणिक उपक्रम भविष्याभिमुख बनवावे लागतील भविष्य हे घडत नसते ता आपणांस ते घडवावे लागते याबाबत Tofflerयांनी म्हटले आहे “The Future doesn’t just happen ,we make it and we can it”तर S.M. Ram म्हणतात की “The Future doesn’t encist it is created ”

शिक्षक शिक्षणात सध्या खूप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. त्याला जर वेळीच जर निर्बंध घातले नाही तर त्याचा बकासुर होण्यास वेळ लागणार नाही पुढील ठिकाणी आपणास भ्रष्टावार बोकाळलेला दिसतो.

**विदयार्थी गैरहजेरीचे प्रमाण** :– सध्या बी.एड्,एम.एड् महाविद्यालयातील गळतीचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढले आहे. विदयार्थी प्रवेश घेतांनाच शहानिशा करतात की बाहेरून बी.एड् केले तर चालेल का? आणि केववळ त्याच ठिकाणी विदयार्थी प्रवेशीत होतात की ज्या ठिकाणी महाविद्यालय विदयार्थ्यांना परवानगी देतात तर इतर ठिकाणी ठिकाणी त्या तुलनेने प्रेवशकमी होतात.

शिवाय पूर्वीच्या प्रमाणे आता विदयार्थी वर्गात हजर राहत नाही भविष्यात काय परिस्थिती असेल याचे चित्र डोळयासमोर न आणलेलेच बरे. विदयार्थ्यांची वार्षिक परिक्षेला बसण्यासाठी किमान 80 टक्के हजेरी असावी लागते अन्यथा त्यांना विद्यापीठ नियमानुसार परिक्षेला बसता येत नाही मात्र त्याची हजेरी लावली जाते. व परिक्षेला बसविले जाते म्हणजेच हा एक प्रकाराचा नैतिक भ्रष्ट्राचारच म्हणावा लागेल.

**विद्यापीठ स्तरावरील वेगवेगळया समित्यांची दिशाभूल :–** वेगवेगळया कारणासाठी महाविद्यालयास भेटीसाठी समित्यांची नेमणूक कसे. त्या.उद. स्थानिक चौकशी समिती,स्टॉफ निवड समिती,पूर्नरमूल्यांकन समिती, ज्या दिवशी ही समिती महाविद्यालयास भेट देते त्यावेळेस त्या महाविद्यालयाची स्थिती वेगळी असते आणि इतर

दिवशी स्थिती वेगळी असते.ब—याच वेळेस वेगळीच किंवा खोओी माहिती त्या त्या समितीला पूरविली जाते.व ती वेळ भागवून नेली जाते. उद. दुस—या महाविद्यालयातील किंवा संस्थेतील फर्निचर त्यासाठी आणले जाते व समितीची देखरेख झाल्यावर तेपरत त्या ठिकाणी नेउन ठेवले जाते.

**समितीवर नेमलेल्या प्राध्यापकांची नैतिकता** :— ब—याच वेळेच एखादया महाविद्यालयास एखादया समितीने भेट दिली असता त्या महाविद्यालयास काहीतरी उणिव असते आणि ती उणिव /त्रुटी त्या पूर्तता अहवालात लिहू नये यासाठी संस्था किंवा महाविद्यालय त्यांना पाकिटातून पैसे देतात त्याचबरोबर संबधत प्राध्यापकांची सुध्दा पैसे मागण्याची मानसिकता असते त्यामुळे हा सगळाच शिक्षणाला लागलेला खूप मोठा कलंक आहे.

**विद्यापीठाकडून मंजूर झालेला पैशांचा अयोग्य वापर :—** वेळेस ज्या कारणांसाठी विद्यापीठ अनुदान देते तो पैसा त्या कारणांसाठी खूप कमी प्रमाणात खर्च कमी केला जातो.आणि तात्पुरता कार्यक्रमासाठी खर्च केला जातो. बाकी मध्येच कोणीतरी गडप करते ही एक प्रकारे विद्यापीठाची शिक्षणाची किंवा शिक्षणक्षेत्रांची लुबाडणूकच आहे.

शिक्षकांची होणारी पिळवणूक :— सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठा अंतर्गत एकही शासकीय अध्यापक महाविद्यालय नाही केवळ अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांचीच खुप मोठया प्रमाणात संख्या आहे आणि विनाअनुदानित महाविद्यालयाचे असल्यामुळे त्या त्या महाविद्यालयात संबंधीत संस्थेचे नियम,कायदे,चालतात व विद्यापीठ नियम व कायदे धाब्यावर बसविलले जातात .त्यामुळे त्यात शिक्षकांची खूप मोठया प्रमाणात पिळवणूक होते. साधारणतः शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राध्यापक होण्यासाठी शैक्षणिक अर्हता ही एम.ए.एम.एड् सेट किंवा नेट शिक्षणशास्त्र अशी असावी लागते.आणि हे शिक्षण पूर्ण करण्यासाठी वयाचे 25 ते 27 वर्षे घालावावे लागतात त्यानंतर कोठेतरी शिक्षक प्रशिक्षणाची नोकरी स्वीकारल्यावर त्याची विविध स्तरातून पिळवणूक केली जाते.

1. **आर्थिक पिळवणूक :—** ब—याच वेळे विनाअनुदानित महाविद्यालय शिक्षकांना बॅकेत पगार वेगळा दाखविला जातो. व प्रत्यक्षात वेगळाच दिला जातो.त्यामुळे त्याची वाच्यता त्यांना कोठेही करता येत नाही जर वाच्यता केली तर नोकरी जाण्याची भिती असते उदया पोआची खळगी भरण्यासाठी कोठेही वाच्यता करत नाही पर्यायाने त्याची खूप मोठया प्रमाणात अर्थिक पिळवणूक होते.
2. **प्राचार्यांच्या अपेक्षाः—**प्राचार्यांना असे वाटते की सर्व शैक्षणिक प्रशासकीय व इतर कामकाज प्राध्यापकांनीच करावे.आणि त्यांनी जर हे कामे नाही केली तर त्यांना जास्त कामाचा भार दिला जातो व प्राध्यापकांची प्राचार्यही अशा प्रकारे पिळवणूक करतात.
3. **संस्थाचालकांकडून झालेली पिळवणूक :—** आज आपण्स पाहतो बी.एड् व एम.एड् प्रवेश घेणा—या विदयार्थ्यांची संख्याफार कमी झालेली आहे. आणि जे विदयार्थी प्रवेश घेतात त्यापैकी 50 ते 60 टक्के विदयार्थी गैरहजर राहतात त्यामुळे त्यांना वर्गात अध्यापनासाठी ते हजर राहत नाही पर्यायाने परिक्षेस

नापास होतात. आणि मग परत संस्थाचालकांना असे वाटते की एवढे विदयार्थी नापास का झाले? आणि परत त्याचे खापर शिक्षकांच्या माथी फोडले जातात.

4. **विदयार्थ्यांकडून होणारी पिळवणूक :–** ब–याच वेळेचे विदयार्थ्यांना वारंवार फोन करून सुध्दा विदयार्थी महाविद्यालयात येत नाही त्यामुळे विदयार्थ्यांचे प्रात्यक्षिक वेळेवर पूर्ण होत नाही जे होते त्यात गुणवत्ता राहत नाही लिहलेली दोन ते चार हस्तक्षरात लिहले असते. त्यावेळेस प्राध्याापक तपासतात त्यावेळेस दुसरे प्रात्यक्षिक लिहण्यासाठी त्यांचकडे वेळही नसतो. आणि ते प्रात्यक्षिक तसेच स्विकारले जाते. त्याची भिती त्या विदयार्थ्यांपेक्षा संबंधीत प्राध्यापकालाच खूप मोठया प्रमाणात असते अशा प्रकारे विदयार्थ्यांकडून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे प्राध्यापकांची पिळवएाूक होते.
5. **मूल्यांकन समितीच्या अपेक्षा :–** मूल्यांकन समितीच्या अपेक्षा सुध्दा हया प्राध्यापकांकडेच असतात कोणतेही समिती प्राचार्यांना न बोलता केवळ त्या संबंधीत प्राध्यापकांनाच दोषी ठरवितात.मात्र त्याला वेगळयावेगळया गोष्टी कारणीभूत असतात.त्यामुळे सुध्दा प्राध्यापकांची खुप मोठया प्रमाणात छळ होत असतो.
6. **समाजाच्या व कुंटुंबाच्या अपेक्षा :–**प्राध्यापकांकडे त्यांच्या वैयक्तिक कुंटुंब व समाजाच्या खूप मोठया प्रमाणात अपेक्षा असतात आणि त्या असाणे ही साहजिकच आहे. परंतु कुंटुबच्या व समाजाच्या अर्थिक गरजा त्या पूर्ण होवू शकल्यामुळे प्राध्यापकांची खुप मोठया प्रमाणात नैतिक हानी झाल्यासारखे वाटते.

या व्यतिरिक्त ही खूप मोठया प्रमाणात वेगवेगळया कारणासाठी प्राण्यापकांची पिळवणूक होत असते.

**समारोपः–** वरीलप्रमाणे शिक्षक शिक्षणात खूप मोठया प्रमाणात भ्रष्ट्राचार वाढलेला आहे आणि जर तो कमी केला गेजा ती ख–या अर्थाने शिक्षक शिक्षणाला ओळख राहणार आहे. अन्यथा शिक्षक शिक्षणाची फार महाभयंकर दिवस येतील त्यात काही शंकाच नाही त्याचप्रमाणे आज जी प्राध्यांपकांची जी काही झाली तर शिक्षक शिक्षणाचे भविष्य उज्जवल राहणार आहे. म्हणून शिक्षक शिक्षणातला शिक्षक हा कणा आहे आएिा जर तो मोडला तर ही शिक्षण व्यवस्थाच ढासाळून पडल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ**

*कुंडले म.बा. (1990) शैक्षणिक ,तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती श्री विद्या प्रकाशन ,पुणे*

*जगताप ह.ना. (2007) शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने :नूतन प्रकाशन ,पुणे*

*जोशी अरविंद (1995) शिक्षक प्रशिक्षण आव्हाने धुळे एज्युेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय धुळे*

*पाटील लिला (1974) आजचे शिक्षण आजच्या समस्या :श्रीविद्या प्रकाशन पुणे*

*मोर चंद्रकांत (2009) शिक्षक शिक्षण :नित्य नुतन प्रकाशन पुणे*